प्रेसनोट दिनांक ०३/०८/२०१९.

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

### विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या पोलीसांकडुन गुन्हयातील पाहिजे असलेला चोरटा जेरबंद

तक्रारदार श्री. गोरक्षमहाराज भाऊसाहेबमहाराज नागासन्यासी, वय”६५ वर्षे, राहणार- मु.पो.गाणगापुर, ता.अफजलपुर, जिल्हा-गुलबर्गा, कर्नाटक राज्य, यांची भगव्या रंगाची कापडी झोळी व त्यांतील ग्रंथ,पुस्तके, आधारकार्ड,पॅनकार्ड,व १०००/-रुपये किंमतीचा एक जिओ कंपनीचा मोबाईल असे दिनांक- २६/०७/२०१९ रोजी विठ्ठल मंदीरा समोरील सार्वजनिक रोडवरुन चोरीस गेलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गु.र.नं.२७१/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

मा.पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ-१,पुणेशहर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो.विश्रामबाग विभाग,पुणेशहर, यांचे मार्गदर्शनाप्रमाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कलगुटकर तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी, श्री. विजय जाधव, पोलीस उप निरीक्षक, पो.हवा.शरद वाकसे, पोलीस नाईक, धिरज पवार, बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, राहुल पवार, प्रशांत शिंदे, चेतन शिरोळकर यांनी तपास करुन सदर गुन्हयाचे तपासकामी आरोपी नामे सुनिल सुरेश यादव,वय-२० वर्षे, राहणार-वडगांव रोड,आळंदी,जिल्हा-पुणे यांस अटक करुन त्याचेकडुन वरील गुन्हयातील चोरीस गेलेला मोबाईल हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकींस आणलेला आहे. तसेच सदर अटक आरोपीकडे कसुन तपास करुन त्याने यापुर्वी केलेले विश्रामबाग पोलीस ठाणे, (१) गु.र.नं. १७०/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९, (२) गु.र.नं. २१५/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९ आणि (३) गु.र.नं. २६५/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९ असे एकुण ०४ चोरीचे गुन्हे उघडकींस आणुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

(दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.